दावा दाखल तारीखः १४.०५.२०१५
दावा नोदंणी तारखीः १४.०५.२०१५
निकाल तारीख : ३०.०६.२०१८
कालावधी : वर्ष महिने दिवस
०३ ०१ **१६**

# सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अकोट यांचे न्यायालय, अकोट.

**(पिठासीन अधिकारी श्री डी.एस. पिसाळ)**

**नियमित दिवाणी दावा कमांक ९२/२०१५**
**CNR No.MHAK06-002540-2015**

**निशाणी कमांकः**

कु. राही विश्वंबर सोनोने
वय १३ वर्ष व्यवसाय : शिक्षण
तर्फे अ.पा.क.रमेश इंद्रभान भरक्षे,
रा. मुंडगाव
ह.मु.हिवरखेड ता. तेल्हारा जिल्हा अकोला .. वादी

— वि —

१. समशेर खॉ मनसूर खॉ
वय ४३ वर्ष व्यवसाय : शेतकरी
रा. मुंडगाव ता. अकोट जिल्हा अकोला

२. रामदास काशीराम सोनोने
वय ५० वर्ष व्यवसाय : शेती
रा. अकोली जहॉ ता अकोट जि. अकोला .. प्रतिवादी

दावा : मालकी हक्काची घोषणा करुन अनिवार्य व
कायम स्वरुपी मनाई हूकूम मिळणेबाबत.

.................................................................................................

श्री. आर एच पुंडकर वकील वादीकरिता
श्री. देशपांडे वकील प्रतिवादी क.१ करिता
श्री. आर व्ही कुळकर्णी वकील प्रतिवादी क.२ करिता

.................................................................................................

<u>न्यायनिर्णय</u>
दिनांक ३०.०६.२०१८

प्रस्तुतचा दावा हा वादीने मालकी हक्काची घोषणा करुन अनिवार्य व कायम स्वरुपी मनाई हुकूम मिळणे करिता दाखल केला आहे.

वादीचे कथन असे की,
२. प्रस्तुत वादग्रस्त दाव्यातील वादी ही मयत पिता विश्वंबर सोनोने व आई नर्मदा सोनोने यांची मुलगी आहे. तिचे वडील विश्वंबर यांचा मृत्यु दिनांक २४.०५.२००३ रोजी व आई नर्मदा हिचा मृत्यु दिनांक २०.०७.२००६ रोजी झाला. वादी ही अज्ञान असल्यामुळे तिचे पालनकर्ता म्हणून रमेश इंद्रभान भरक्षे यांनी दावा दाखल केला आहे. रमेश भरक्षे यांनी प्रकरण क्रमाक २९/२०१२ वादीची पालक म्हणून काळजी घेण्याकरिता व तिच्या मालमत्तेची देखरेख करण्यासाठी व संरक्षणा करीता अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज माननीय जिल्हा न्यायाधीश – १ अकोट यांनी दिनांक १६.०४.२०१५ रोजी मंजूर होवून रमेश भरक्षे यांना कायदेशीर पालक म्हणून अधिकार प्राप्त झाले आहेत.

३. प्रस्तुत दाव्यातील वाद मालमत्ता मौजे अमीनापूर येथील गट क्र. ११/२ अ, मधील क्षेत्रफळ २हे ३० आर पैकी ०.८१ आर, ही जमीन वादीची आई नर्मदा विश्वंबर सोनोन हिच्या नावे होती. तिच्या मृत्यनंतर ७/१२ मध्ये कु. राही विश्वंबर सोनोने हिच्या नावाची कायदेशीरपणे नोंद झाली. सदर वाद शेतीची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | श्रावण भरक्षेचे शेत |
| पश्चिमेस | : | श्रीकृष्ण दहिभात यांचे शेत |
| उत्तरेस | : | रतिराम कळोते यांचे शेत |
| दक्षिणेस | : | रमशेरखॉ यांचे शेत ( प्रतिवादी क्र.१) |

४. वादीच्या आई–वडीलांचे मृत्युनंतर प्रतिवादी क्र.१ व २ यांचेमध्ये मिळकतीच्या ताब्याबद्दल व कायदेशीर हक्काबद्दल वाद निर्माण झाले. त्यामुळे

प्रतिवादी क्र.१ याने वि.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, अकोट यांचे न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्रमांक ४७/२००९ उद्‌घोषणा व निरंतर मनाई हुकूमासाठी प्रतिवादी क्र.२ च्या विरुध्द दाखल केला होता. सदर दावा मंजूर होवून प्रतिवादी क्र२ याने प्रतिवादी क्र.१ च्या कबज्याचा हक्क खंडीत होईपर्यंत गट क्र.११/२ अ च्या एकूण क्षेत्रफळापैकी ०.८१ आर ला कोणताही हरकत अडथळा निर्माण करु नये असा निरंतर मनाई हुकूम दिला आहे. ज्यावेळी प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ च्या विरुध्द दावा क्रमांक ४७/०९ दाखल केला, त्यावेळी वादी अस्तित्वात होती. परंतु, प्रतिवादी क्र.१ ने वादीला त्या दाव्यात प्रतिवादी केले नाही व वादीला त्या दाव्यासंबंधी काहीच कल्पना नव्हती. त्यामुळे त्या दाव्याचा हूकुमनामा वादीवर बंधनकारक नाही. वादीच्या तर्फे अ.पा. क म्हणून तिच्या संपत्तीची देखरेख व सरंक्षण करण्याकरिता रमेश इंद्रभान भरक्षे यांना नियुक्त केले आहे. वादीच्या शैक्षणिक गरजा व भविष्यातील इतर आवश्यक गरजा पुर्ण होण्याकरिता वादीच्या वतीने रमेश भरक्षे यांनी सदरचा वाद मिळकत ही वादीच्या मालकी हक्काने ताब्यात घ्यावी व प्रतिवादी क्र.१ व २ यांनी सदरच्या ताब्याला व वहितीला अडथळा करु नये म्हणून दावा दाखल केला आहे.

५. प्रतिवादींना समन्स काढण्यात आले. प्रतिवादी त्यांचे वकीलांमार्फत न्यायालयात हजर झाले. प्रतिवादी क्र.१ ने नि.२१ व प्रतिवादी क्र.२ ने नि.२३ अन्वये त्यांचे म्हणने दाखल केले आहे.

६. प्रतिवादी क्र.१ याने वादीचे संपुर्ण कथन अमान्य केले आहे. प्रतिवादीचे कथन असे की, वादीचे वडील विश्वंबर यांची पत्नी नर्मदाबाई सध्या हयात नाही. त्यामुळे वादी ही त्यांची मुलगी आहे हे दाखविणे आवश्यक आहे व ती कायदयाने सदरचा दावा दाखल करु शकते. तसेच, प्रतिवादी क्र.१ रमेश भरक्षे यांना अ.पा.क म्हणून नियुक्त केले हे मान्य नाही. रमेश भरक्षे यांनी त्या दाव्यामध्ये प्रतिवादींना पक्षकार केले नाही, नाहीतर सत्य अभिलेखावर आले असते. त्यामुळे रमेश भरक्षे यांना दावा दाखल करण्याचा अधिकार आहे ते मान्य

नाही. प्रतिवादी क्र.१ ने अमीनापूर येथील गट क्र. ११/२–अ मध्ये वादीच्या आई वडीलांचे नावे आहे व वादी त्याचा मालक आहे हे अमान्य आहे. त्यामुळे वादीला कोणताच अधिकार व हक्क नाही. दिवाणी दावा क्र.४७/०९ चा मालक प्रतिवादी क्र.१ असल्यामुळे दूस–या कोणाला त्यात हक्क नाही. दिवाणी दावा ४७/०९ मध्ये वादी पक्षकार नसल्यामुळे तो न्यायनिर्णय व हुकूमनामा वादीला लागू नाही. नर्मदा विश्वंबर सोनोने यांना मुलगा व मुलगी नसल्यामुळे दिवानी दावा क्र.४७/०९ मध्ये वादीला पक्षकार करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. वादी अज्ञान असल्यामुळे वादीतर्फे प्रतिनिधी अधिकार प्राप्त नाही. प्रतिवादी क्र.१ ने दिवाणी दावा क्र. ४७/०९ मध्ये कायदेशीर वारस दाखल केलेले आहे. वादीने विश्वंबर सोनोने यांचा मृत्यु दि २४.०५.२००३ व वादीचा जन्म दि ३१.०७. २०१५ प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केले आहे. त्यामुळे वादी ही वाद मिळकतीची मालक ठरु शकत नाही. त्यामुळे वादीला कायदेशीर कोणताही अधिकार नाही. तसेच, सदरची वादग्रस्त मालमत्ता नथ्थु तुकडुजी भरक्षे व त्यानंतर नर्मदाबाई यांचे नावाने नोंदविली गेली होती. प्रत्यक्षात वाद मिळकत सोनाने कुटुंबातील असल्याने, त्या कुटूंबातील कोणतीही व्यक्ती वि. न्यायालयाचे समोर न आल्याने त्याचा गैरफायदा घेवून दावा दाखल करण्यात आला आहे. म्हणून वादीचा दावा खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

७. प्रतिवादी क्र.२ याने नि.२३ मधील लेखी जबाबात प्रतिवादी क्र.१ च्या कथनाप्रमाणे कथन केले आहे. त्यांचे म्हणने असे की, अ.पा.क. यांनी बनावटी कागदपत्रान्वये वादा दाखल करण्यासाठी अधिकार प्राप्त केला आहे. सदर मालमत्ता प्रतिवादीने कायदेशीर करार करुन ताब्यात घेतली आहे. तसेच ती मालमत्ता प्रतिवादी क्र.१ कडे २०१९ पावेतो राहणार आहे व त्यासंबंधीचा करार झाला आहे. दिवाणी दावा क्र.४७/०९ मध्ये न्यायालयाने प्रतिवादी क्र.१ कडून दावा मंजूर केल्यामुळे तो हुकूमनामा वादीला लागू पडत नाही. वादी अज्ञान असल्यामुळे अ.पा.क यांना दावा दाखल करता येत नाही. प्रतिवादीला दिनांक ४.६.२००९ रोजीच्या करारनाम्यानुसार अधिकार प्राप्त झाला आहे. सदर

मालमत्ता ही मयत नर्मदाबाई सोनाने यांनी विकत घेतली होती. परंतु त्यांना कोणतेही अपत्ये नव्हते. त्यामुळे प्रतिवादीला सर्व हक्क व अधिकार प्राप्त आहे व त्यांनी प्रतिवादी क्र.१ ला जून— २००९ ते मे—२०१९ पर्यंत कायदयाने दिले आहे. प्रतिवादी मे—२०१९ पर्यंत कायदयाने मालक असून वादीला कोणत्याही प्रकारचा अधिकार नाही त्यामुळे वादीचा दावा खारीज करण्यात यावा.

८. माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी वाद मुद्दे निश्चीत केले आहे आणि मी माझे निष्कर्ष कारणमिमांसा देवून खालील विवेचनाव्दारे मुद्दयावर नोंदविले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्श |
|---|---|---|
| ०१ | वादी दावा मिळकतीची मालक असल्याचे सिध्द करतो काय? | होय |
| ०२ | वादी वाद मिळकतीची ताबा मिळण्यास पात्र आहे काय? | होय |
| ०३ | वादी प्रतिवादीं विरुध्द कायमचा मनाई हुकूम मिळण्यासाठी पात्र आहे काय? | नाही |
| ०४ | कोणता आदेश व हूकूमनामा? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

९. वादीने तिचा दावा सिध्द करण्यासाठी तिचे तर्फे अ.पा.क म्हणून रमेश भरक्षे यांचे पुराव्याचे प्रतिज्ञालेख नि.२५ अन्वये दाखल केला आहे. वादीचा साक्षीदार क्र.२ शांताबाई भिमराव तेलगोटे हिचे पुराव्याचे प्रतिज्ञालेख नि. ३७ अन्वये दाखल केला आहे. वादीचा साक्षीदार क्र.३ रामभाउू मोतीराम मसुरकर यांचे पुराव्याचे प्रतिज्ञालेख नि.३८ अन्वये दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.१ समशेरखॉ याने स्वत:चे प्रतिज्ञालेख नि.४३ अन्वये दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.१ ने साक्षीदार क्र.२ वसंत नागोराव ढगे यांचे प्रतिज्ञालेख नि.६३ अन्वये दाखल केले. प्रतिवादी क्र.१ ने साक्षीदार क्र.३ शेख जावेद शेख

हारुन यांचे प्रतिज्ञालेख नि.६५ अन्वये दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.२ रामदास नि.७६ प्रतिवादी क्र.१ तर्फे साक्षीदार क्र.२ भिमराव गरकर यांची साक्ष नि.९० अन्वये आहे.

१०. वादीने कागदोपत्री पुरावा म्हणून अभिलेखावर वादीचे जन्म प्रमाणपत्र नि.३०, विश्वंबर काशीराम सोनोने यांचे मृत्यु प्रमाणपत्र नि.३१, फेरफार पत्रक झेराक्स कॉपी नि.३२, किरकोळ अर्ज क्रमांक २९/१२ फोटो कॉपी नि.३३, नर्मदाबाई सोनोने हिचे मृत्यु प्रमाणपत्र नि.३४, गाम नमूना सात महा–ई–सेवा यांन दिलेला नि.३५, गाव नमूना आठ नि.३६. प्रतिवादी क्र.१ ने कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला. जसे, शेत वहीतीचा करारनामा नि. ६५, लागवन पटटा नि.४८ व नि.७६,प्रतिज्ञालेख नि.४९ व ५८, खोडतोड नक्कल नि.५० आणि ५१, गाव नमूना सात नि. ५२, नियमित दिवाणी मुकदमा क्र. ४७/२००९ च्या न्यायनिर्णचाची प्रत नि.५३, हुकूमनामा नि.५४, नोटीस दिनांक १३.०७.२०१५ नि.५५, नोटीस दि २७.०७.२०१५ नि.५६, पोष्टाची पावती नि.५७, पोलीस स्टेशनला तक्रार नि.५८, रामदास सोनोने यांचा प्रतिज्ञालेख नि.५९, टी.आय अर्ज नि.६१, मनाई हुकूम नि.६२, रमेश भरक्षे यांचा विनंती अर्ज नि.९२, जन्म अहवल दि०९.१.२००५ नि.९१. वादीने नि.४० अन्वये, प्रतिवादी क्र.१ नि.६७ व व प्रतिवादी क्र.२ नि.९३ पुर्सीस देवून पुरावा बंद केला आहे.

<u>मुद्दा क्र.१ करिता</u> :–

११. प्रतिवादी क्र.१ समशेर ने वाद मिळकत वार्षिक मोबदला देवून वहितीकरिता प्रतिवादी क्र.२ कडून ताब्यात घेतलेली आहे. वादीची आई मयत नर्मदाबाई ही वादमिळकतीची मालक होती असे प्रतिवादी क्र.१ समशेरने यापुर्वी दाखल केलेला दिवाणी दावा क्रमांक ४७/२००९ मध्ये कथन करुन मान्य केलेले आहे. तो या दाव्यामध्ये नर्मदाबाई पुर्वी वादमिळकतीची मालक नव्हती असे म्हणू शकत नाही. तसेच, असे म्हणण्यास त्याला कायदेशीर प्रतिबंध देखील आहे.

१२. मयत नर्मदाबाई वेडी असल्यामुळे तिच्या वतीने विविध लोकांनी वाद मिळकती बाबत व्यवहार करण्याचा प्रयत्न केला. नर्मदाबाई मालक आहे परंतु ती वेडी असल्यामुळे वादमिळकती बाबत यथोचीत व यथायोग्य व्यवहार होत नव्हते. पुर्वी दाखल केलेल्या दाव्यामध्ये वादीच्या वतीने विविध लोकांनी प्रतिवादी क.१च्या ताब्यास हरकत अडथळा घेतला म्हणून त्याने त्यासर्वांना पक्षकार करुन त्या सर्वाविरुध्द आणि प्रतिवादी क.२ विरुध्द देखील मनाई हुकूम घेतलेला आहे.

१३. यापुर्वी प्रतिवादी क.१ ने वाद मिळकतीचा लागवन पट्टा नि.७६ मयत नर्मदाबाईची आई ध्रृपदाबाई कडून सन २००७ ते २०१२ या पाच वर्षा करीता घेतला. नर्मदाबाईची ध्रुपदाबाई एकमेव वारस आहे असे प्रतिज्ञापत्र नि.५८ वर देखील दाखल आहे ते प्रतिज्ञापत्र प्रतिवादी क.१ ने दावा मिळकत लागवन पट्टयावर घेतानां दि १६.४.२००७ रोजी करुन घेतल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे प्रतिवादी क.२ रामदास कडून वादमिळकतीचा वहितीचा करारनामा नि.५७ सन २००९ ते २०१९ या दहा वर्षा करिता त्याने करुन घेतला आहे. तसेच, मागील प्रमाणे प्रतिवादी क२ वादमिळकतीचा तो एकमेव वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र दि १४.५.२००९ रोजी करुन घेतल्याचे दिसून येते. ती सर्व कागदपत्रे प्रतिवादी क.१ समशेरने दाखल केली आहे. या कागदपत्रांचे आधारे वादमिळकतीचा त्याने कसा ताबा घेतला आणि वादमिळकतीचे मालक कोण आहे हे दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. करारनामे करुन देणारे व्यक्ति मालक असल्याबाबत कोणताही पुरावा प्रतिवादी क.१ ने दाखल केलेला नाही.

१४. प्रतिवादी क.१ च्या विविध लोकांकडून वादमिळकत भाडे पट्टयाने घेण्याचे कृतीवरुन तो वादमिळकतीचे मालक कोण आहे या बद्दल संभ्रमीत असल्याचे दिसून येते. प्रतिवादी क.१ ब–याच वर्षा पासून वादमिळकतीमध्ये वहिती करतो, वर्षानुवर्ष त्याचे ताब्यात वादमिळकत आहे. नर्मदाबाई वेडी असल्यामुळे तिच्या वतीने जो कोणी वादमिळकती बद्दल अधिकार दर्शवेल त्याचेकडून करारनामे करुन, सदर शपथपत्र करुन वाद टाळून त्याने वहिती केली आणि करत असल्याचे दिसून येते.

१५. प्रतिवादी क्र.२ त्याचा साक्ष पुराव्यात नि.७६ मध्ये स्पष्टपणे कबूल करतो की प्रतिवादी क्र.१ ने सांगितले की, जर तुम्ही मला करारनामा करुन दिला तर तुम्ही शेताचे मालक व्हाल. त्यामुळे करारनाम्यावर सही केली. करारनामा करुन देतांना त्याला वादमिळकत वहिती देण्यासाठी अधिकार नव्हते. त्याचे ७/१२ मध्ये नाव देखील नव्हते. करारनामावर सही करण्याचा उद्देश वादमिळकतीचा तो मालक व्हावा हा होता यावरुन करारनामे नि.५७, ४८, तसेच शपथपत्र नि.५८ व ५९ करतांना प्रतिवादी क्र.१ ला सदर लोक मालक नाहीत याची जाणीव होती.

१६. नर्मदाबाई दि २०.७.२००६ रोजी वारली. त्यानंतर वादमिळकतीला वादी कु.राही तिचे नाव वारस म्हणून नोंदविण्यात आले. त्याचा फेरफार उतारा नि.३२ अभिलेखावर दाखल आहे. नर्मदाबाई मयत होण्यापुर्वी तिचा पती विश्वंभर दि २४.५.२००३ रोजी मयत झाला त्याचे मृत्युप्रमाणपत्र नि.३१ दाखल आहे. वादी कु. राही हिचा जन्म दि ३१.७.२००५ रोजी झाला त्यामुळे वडीलांचे मृत्युनंतर जन्म दोन वर्षांनी झाल्यामुळे ती विश्वंभरची औरस मुलगी नाही असा जोरदार आक्षेप प्रतिवादी क्र.१ ने घेतला. परंतु, नर्मदाबाई वादमिळकतीची मालक नव्हती असे कथन प्रतिवादी क्र.१ करत नाही. त्यामुळे आणि यापुर्वी देखील पुर्वीच्या दाव्यात व या दाव्यात त्याचे शपथपत्रामध्ये वाद मिळकत नर्मदाबाईची असल्याचे मान्य केलेले कथन पाहता नर्मदाबाई या मिळकतीच्या मालक असल्याचे निसंशय स्पष्ट होते.

१७. प्रतिवादी क्र.२ च्या वतीने श्री भिमराव गरकर साक्षीदार क्र.२ याची साक्ष नि.९० वर नोंदविली आहे. ते साक्षीदार हिवरखेड ग्रामपंचायत मध्ये सचीव म्हणून कार्यरत आहे. जन्म दाखला दिल्या नंतर त्यामध्ये दुरुस्ती करण्यात आली या बद्दल हा साक्षीदार न्यायालयात बोलाविला होता. वादी राहीचा जन्म दि ३१.७.२००५ रोजी झाला हे तिचा जन्म दाखला नि. ३० वरुन स्पष्ट होते. या दाखल्यात तिचे आईचे नाव सौ नर्मदा विश्वंभर सोनोने असे दर्शविले आहे यावरुन तिचे आई वडील नर्मदा व विश्वंभर आहेत हे स्पष्ट होते.

१८. वादी राही च्या जन्मा नंतर तिचे पालक रमेश भरक्षे यांनी दि ९.८. २००५ रोजी सचिवांकडे अर्ज करुन मुलीच्या नावाची नोंद करतांना चुक झाली म्हणून अर्ज नि.९२ केला होता. त्यांचे अर्जा वरुन आणि जन्म अहवाल नि.९१ वरुन अगोदर जन्माची नोंद करतांना राहीचे वडील रमेश इंद्रभान भरक्षे आणि आई इंदू असे दर्शविले होते. परंतु, सदर अर्ज नि.९२ दाखल करुन नावात दुरुस्त करण्यात आली आणि राहीचे वडील विश्वंभर सोनोने आणि नर्मदा असे नाव दूरुस्त करुन त्यात नोंदी केलेल्या आहेत. प्रतिवादींच्या वतीने हा पुरावा सादर करुन वादी राहीचे आई वडील नर्मदा व विश्वंभर नाहीत हे सिध्द करण्याचा प्रयत्न केला. तिच्या पितृत्व व मातृत्व बद्दल संभ्रम निर्माण व्हावा असा देखील त्यांचा प्रयत्न दिसून येतो. या दाव्यातील वादीचा पालक रमेश इंदभान भरक्षे हाच तिचा बाप आहे. राहीचे आई वडील विश्वंभर आणि नर्मदाबाई नाहीत हे त्यांनी दर्शविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१९. वरील दुरुस्ती अर्ज राहीच्या जन्मा नंतर लगेचच सुमारे आठ दिवसांनी म्हणजे दि ९.८.२००५ रोजी केलेली आहे. जन्म झाल्यानंतर ताबडतोब (आठ दिवसांनी ) चुकीची दुरुस्ती केल्यामुळे जन्म दाखल्यातील चुक सहज किंवा नजरचुकीने झाल्याचे स्पष्ट होते. कारण तेव्हा, वादमिळकती बद्दल प्रतिवादी क्र. १ व २ यांचेमध्ये वाद नव्हता. त्यावेळी वाद मिळकतीचा ताबा प्रतिवादी क्र.१ किंवा २ कडे असल्याबद्दल कोणत्याही नोंदी अभिलेखात दाखल नाही. वादाच्या खूप पुर्वी या नोंदी व दुरुस्ती झाल्या असून त्या आजपर्यंत आव्हानीत केलेल्या नाहीत. त्यामुळे त्या सर्व साधारणपणे आणि नैसर्गिकपणे घडल्या असल्याचे प्राबल्यतेच्या बळावर स्पष्ट होते. राही रमेशच्या आत्याची मुलगी आहे. त्याने झालेली चुक ताबडतोब दुरुस्त केली असल्यामुळे त्याबद्दल वादी राहीचा पालक रमेश भरक्षे याचा मिळकत हडप करण्यासाठी अनुचीत उद्देश होता किंवा पुढील नियोजन करुन त्याने नर्मदाबाई नंतर स्वत:च्या मुलीला राही म्हणून उभा केले असे प्राबल्यतेच्या बळावर म्हणता येणार नाही.

२०. वादमिळकतीतील साक्षीदार क्र.२ शांताबाई साक्ष कथन नि.३७ मध्ये कथन करते की, नर्मदाबाई तिची चुलत बहीण होती. तिचे लग्न विश्वंभरशी झाले. लग्न झाल्यानंतर दोन महिन्याची ती वेडी झाली. त्यामुळे ती गावोगावी

फिरु लागली त्यामुळे विश्वभरने तिचे कडे दुर्लक्ष केले. ती गरोदर असतांना ७ व्या महिन्यात कुत्र्याने तिचे पायाला चावा घेतला नंतर ती आजारी पडून हिवरखेड येथे प्रसुत झाली आणि तिला प्रसुत होवून राहीचा जन्म झाला, काही दिवसांनी मरण पावली अशी साक्ष रामभाऊ साक्षीदार क्र.३ यांनी वादी करीता नि.३८ वर नमूद केली आहे.

२१. राही नर्मदाबाईची मुलगी नाही अशी स्पष्ट उलट तपासणी प्रतिवादींनी या साक्षीदारांना केलेली नाही. तिच्या जन्मा बद्दल काही कागदपत्रे पाहिली आहेत काय याबद्दल प्रश्न केलेले आहेत. सर्व साधारणपणे राही नर्मदाबाईची मुलगी नाही अशी उलट तपासणी दिसून येत नाही. या साक्षीदारांना जन्मा बद्दल कागदपत्रे विचारणे योग्य नाही तर ते जन्मा बद्दल थेट साक्षीदार असल्यामुळे जन्म, मातृत्व बद्दल प्रश्न विचारणे अपेक्षीत आहे. राही तिचा पालक रमेशची मुलगी नाही असे शांताबाईने स्पष्टपणे सांगितलेले आहे या साक्ष पुराव्यावरुन राही नर्मदाबाईची मुलगी असल्याचे स्पष्ट होते.

२२. प्रतिवादी क्र.१ ने नर्मदाबाईच्या नातेवाईकाकडून वाद मिळकत प्रतिवादी कडून घेणे या कृती मधून तो स्वतःचा लाभ करुन घेण्यासाठी आणि वादमिळकत ताब्यात ठेवण्यासाठी राही नर्मदाबाईची मुलगी नाही असा बचाव घेत असल्याचे दिसून येते. राहीचा जन्म झाला त्यावेळी आणि न्यायालयाने रमेशला पालक म्हणून नियुक्त केले तेव्हा देखील त्यास या गोष्टीची माहिती नव्हती असे प्रतिवादी क्र.२ नमूद करतो. त्यामुळे त्याने या गोष्टींना आव्हानीत केल्या नाही असे प्रतिवादी क्र.१ चे कथन आहे. नर्मदाबाई मयत झाल्यानंतर आज तागायत वादीच्या वादमिळकतीला फेरफारव्दारे झालेल्या नोंदी प्रतिवादींनी आव्हानीत केलेल्या नाहीत. वादमिळकत नर्मदाबाईची आहे हे दोघांनाही माहीत आहे. या अकृतींमुळे आणि राही नर्मदाबाईची वारस असल्याचे या दोघांनाही माहीत असल्यामुळे त्यांनी जाणीवपुर्वक त्या नोंदी आव्हानीत केल्या नाही असा निष्कर्श प्राबल्यतेच्या बळावर निघत आहे.

२३. यापुर्वी रमेशला पालक म्हणून नियुक्त करतांना मा.जिल्हा न्यायालय

अकोट यांचे कडील सुनावणीमध्ये देखील राही नर्मदाबाईची मुलगी नाही असा बचाव सरकार पक्षा कडून घेतला होता. तेथील सुनावणीचे वेळी गणेश दत्तोजी आणि प्रस्तुत प्रतिवादी क.२ यांनी देखील राही नर्मदाबाईची मुलगी नाही असे कथन केले होते. परंतु तिच्या जन्माच्या नोंदी पाहून न्यायालयाने नर्मदाबाईची राही मुलगी असल्याचे स्पष्ट केले होते. या न्यायालयातील दाखल पुराव्यावरुन देखील राही नर्मदाबाईची मुलगी असल्याचे स्पष्ट होते. जन्म दाखल्यातील या नोंदी दुरुस्ती प्रस्तुत वाद निर्माण होण्यापुर्वी झालेल्या असल्यामुळे त्या विश्वासपात्र असल्याचे न्यायालयाचे मत तयार होते.

२४. प्रतिवादी क.२ ने अनाधिकाराने वादमिळकत प्रतिवादी क.१ ला लागवाड करीता सन २००९ ते २०१९ या काळाकरिता दिली. तसेच, नर्मदाबाईची आई ध्रुपदाबाई हिने देखील वादमिळकत अनाधिकाराने सन २००७ ते २०१२ करिता दिली होती. दोन्ही करारनाम्याचा काळ पाहता तो, काही वर्षा करीता एकत्रित दिसून येतो यावरुन प्रतिवादी क.१ ची संबंधीत लोकांकडून करारनामा व्दारे वादमिळकत घेण्याची कृती देखील बेकायदेशीर असल्याचे दिसून येते व मिळकतीचा ताबा आपल्या कडेच राहावा ही प्रतिवादी क.१ ची इच्छा प्राबल्यतेच्या बळावर स्पष्ट होते. उपरोक्त सर्व तथ्ये पाहता नर्मदाबाई नंतर तिची मुलगी या नात्याने राही वादमिळकतीची मालक प्राबल्यातेच्या बळावर मालक असल्याचे सिध्द ठरते वरील सर्व चर्चे वरुन मुद्दा क.१ चे उत्तर होकारार्थी आहे.

<u>मुद्दा क.२ करिता</u> :

२५. वादी राही आणि तिचे वतीने पालक रमेश यांचे खेरीज कोणालाही वादमिळकती बाबत व्यवहार करण्याचे अधिकार नाही. वादमिळकत कायदेशीर मालका व्यतिरिक्त हस्तांतरीत झालेली दिसून येते. पुर्वीचा दावा कमांक ४७/०९ मध्ये प्रतिवादी क.२ व इतर लोकांना विरुध्द मनाई हुकूम दिला असला तरी तो मनाई हुकूम वादी विरुध्द लागू होत नाही. मनाई हूकूम ख—या मालकाचे विरुध्द देता येत नाही हे न्यायतत्व देखील आहे.

२६.  पुर्वीच्या दाव्याचे न्यायनिकालाचे वेळी न्यायनिवाडा नि.५३ मध्ये प्रतिवादी क्र.१ चा वादमिळकतीतील ताबा न्यायालयीन प्रक्रियेनुरुप जाई पर्यंत मनाई हुकूम दिलेला आहे. या दाव्यामध्ये वादी राही वादमिळकतीची मालक ठरत असल्यामुळे आणि तिच्या वतीने पालक रमेश यांना वादमिळकतीचा ताबा वादीला दयावा अशी विनंती व त्या अनुरुप मुद्दे देखील न्यायालयाने नेमलेले आहे. दावा मुख्यत्वः कायमस्वरुपी मनाई हूकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे परंतु त्या मध्ये मालकी बद्दल पुरावा दाखल करुन  दावा मिळकतीच्या ताब्याची न्यायमागणी केलेली दिसून येते.

२७.  वादी अज्ञान आहे. तिचे वतीने पालक रमेश यांची देखील परिस्थती पाहता केवळ योग्य ती न्यायालयीन पुर्तता केली नाही म्हणून आणि आवश्यक ती कथने दात्यामध्ये केली नाहीत म्हणून दावा सदोष आहे असे म्हणता येणार नाही. नर्मदाबाईचा वेडेपणा, विश्वंभरचा दुर्लक्षीतपणा, राहीचा जन्म, तिचे पालन पोषण, पालक नेमण्याबद्दल रमेश भरक्षे यांनी केलेली कार्यवाही आणि प्रस्तुत दाव्याचा इतिहास पाहता त्रांतीक मुद्दयावर भर देवून दावा रद्द करावा, तसे करणे न्यायोचीत होणार नाही असे न्यायालयाचे मत होते.

२८.  न्यायमागणीप्रामाणे न्यायालयीन मुद्रांक शुल्क वादीने जमा केलेले नाही पंरतु ती न्यायनिर्णयकामी बाधा ठरत नाही. हूकूमनामा तयार करण्यापुर्वी वादींना ताबा आणि मालकी ठरवून जाहीर करण्यासाठीचा मुद्रांक शुल्क जमा करता येईल. वादी दावा मिळकतीची ताबा मिळण्यास कायदेशीररित्या पात्र ठरते. वरील चर्चेच्या आधारे मुददा क्र.२ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्र.३ करिता</u> :—

२९.  वादी अज्ञान आहे. ती सज्ञान होई पर्यंत वाद मिळकतीचे संरक्षण आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.१ चा वादमिळकतीमधील वर्षानुवर्ष ताबा, प्रतिवादी क्र.२ याने बेकायदेशीररित्या वाद मिळकत प्रतिवादी क्र.१ ला लागवडीकरिता दिली आणि या कृती मधून त्याने आर्थिक फायदा करुन घेतलेला आहे. वादीकडे

सध्या वादमिळकतीचा ताबा नाही. त्यामुळे त्या दोघांविरुध्द कायमस्वरुपी मनाई हूकूम वादीच्या हक्कात देणे शक्य होत नाही. म्हणून मुद्दा क.३ चे उत्तर नकारार्थी देण्यात येत आहे. पुवीचा दाखल नियमित दावा क.४७/२००९ मधील न्यायनिर्णयास अधिन राहून मुद्दा क.४ करिता खालील आदेश पारीत करण्यात येते.

## आदेश

१. वादीचा दावा खर्चासह अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. वादी राही विश्वंभर सोनाने वाद मिळकतीचे मालक असल्याचे जाहीर करण्यात येते. तिच्या वतीने रमेश भरक्षे भविष्यातील वादमिळकतीचा प्रत्येक व्यवहार राही सज्ञान होईपर्यंत कायदेशीर पालक म्हणून करतील.

३. प्रतिवादींना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी वाद मिळकतीचा ताबा एक महिन्याचे आत वादीच्या वतीने तिचे कायदेशीर पालक रमेश भरक्षे यांना देण्यात यावा.

४. वादी मालक ठरल्यामुळे ती दावा दाखल तारखे पासून दरम्यानचे उत्पन्न मिळण्यास पात्र ठरते त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश २० नियम १२ प्रमाणे दावा दाखल तारखे पासूनचे पुढील काळाची दरम्यानचे उत्पन्न ठरविणेसाठी चौकशी करण्यात यावी.

५. वरील अतिरिक्त आदेशांना अनुसरुन वादीला असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी प्रस्तुत दाव्यामध्ये मालकी हक्क जाहीर करुन व ताबा मिळण्याकरिता न्यायालयीन मुद्रांक शुल्क दिलेला नाही, दाव्यातील हुकूमनामा तयार करण्यापुर्वी हा मुद्रांक शुल्क न्यायालयात तिने तो जमा करावा.

६. येणे प्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

स्वाक्षरी/–

दिनाक ३०.०६.२०१८ (डी एस. पिसाळ )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, अकोट